**म.वि.स./क-१ (आस्थापना)**

**दि. २१ ऑगस्ट, २०२०**

महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉक डाऊनच्या कालावधीतील १५ टक्के उपस्थितीसंदर्भात महाराष्ट्र महसूल व वन, पुर्नविसन शासन परिपत्रक क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम/१, दिनांक २९ जुलै, २०२० रोजी निर्गमित केलेले परिपत्रक.

उपरोक्त शासन निणर्यानुसार लॉक डाऊनचा कालावधी दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत वाढविण्यात आला असल्याने कोरोना विषाणूचा प्रसार व संसर्ग रोखण्यासाठी या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती १५ टक्के इतकी ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात आली होती. परंतु, आगामी पावसाळी अधिवेशन सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजीपासून सुरु होणार असल्याने, अधिवेशनाच्या कामकाजाची तातडी व निकड लक्षात घेता या सचिवालयातील उप सचिव यांची उपस्थिती १००% तसेच विधानसभा/विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली असल्यामुळे सदरहू दिवशी अवर सचिव/अवर सचिव (समिती) यांची उपस्थिती १००% करण्याचे आदेश झालेले आहेत. या आदेशानुसार पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :-

१) **या सचिवालयातील उप सचिव यांची १००% उपस्थिती पुढील आदेश होईपर्यंत कायम राहील.**

२) **या सचिवालयातील अवर सचिव/अवर सचिव (समिती), दोन्ही उप ग्रंथपाल, कार्यवाही संपादक, मुख्य सुरक्षा अधिकारी व समादेशक अधिकारी (अग्निशमन) यांची केवळ मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी विधानसभा/विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक असल्यामुळे सदरहू दिवसाची उपस्थिती १००% करण्यात आली असून उक्त दिवस वगळता उर्वरित दिवसांची उपस्थिती सोमवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत पूर्वीप्रमाणेच म्हणजे १५% प्रमाणे राहील.**

...२/-

Scanned with CamScanner

३) उपरोक्त सुचना सर्व संबंधितांना कळविण्यासाठी या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या व्हॉटसॅप ग्रुपवर देखील पाठविण्यात याव्यात. त्याचप्रमाणे या सचिवालयाच्या mls.org.in या संकेतस्थळावर देखील अपलोड करण्यात याव्यात.

मा. सचिव (कार्यभार) यांच्या आदेशानुसार

Scanned with CamScanner